व्यंकटेश महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

"नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार पदव्युत्तर पदवीच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना नोकरी प्रशिक्षण आणि फील्ड प्रकल्प कार्य हे अनिवार्य करण्यात आले आहे.विद्यार्थी जे शिक्षण महाविद्यालयामध्ये घेतात त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी कशी केली जाते हे प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून शिकावे यासाठी यूजीसीने विद्यार्थ्यांना नोकरी प्रशिक्षण आणि फील्ड प्रकल्प कार्य अनिवार्य केले आहे." असे विधान जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर येथील प्राध्यापक डॉ. एन. एल. कदम यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे आयोजित एन. ई . पी. अंतर्गत नोकरी प्रशिक्षण आणि फील्ड वर्कची अंमलबजावणी या विषयावर आधारित कार्यशाळेमध्ये बोलत होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रादरम्यान डॉ. एन. एल. कदम यांनी नोकरी प्रशिक्षण संकल्पना समजावून सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या सत्रामध्ये श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. एन. एम. मुजावर यांनी फिल्ड प्रोजेक्ट आणि प्रकल्प अहवाल कसा लिहावा याबद्दल सविस्तरपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व महाविद्यालयातील रिसर्च कमिटी , श्रीमती ए. आर. पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी व अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले यांच्या संयुक्त विद्यमाने सदरची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या साधक व बाधक घटकांची कल्पना विद्यार्थ्यांना दिली. कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले तर कार्यशाळेच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक श्री. टी. एच. नायकवडे यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

